# गुरुकुल महाविद्यालय, चिपळूण.

## <u>महत्त्वाची सूचना</u>

शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात मागासवर्गीय आणि इतर मागासवर्गीय शिष्यवृत्तीखाली सवलत घेऊन प्रवेश घेतला आहे अशा सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींनी मा. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, रत्नागिरी यांच्या सूचनेनुसार आपला सवलतीचा अर्ज **https://mahadbt.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर नव्याने (Fresh) बिनचूक भरावयाचा आहे. तसेच या विद्यार्थ्यांनी मागील वर्षी शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये शिष्यवृत्ती सवलत घेऊन पुढील वर्गामध्ये प्रवेश घेतला आहे, अशा विद्यार्थ्यांनी आपले अर्ज नूतनीकरण (Renewal) वरील वेबसाईटवर पूर्ण करावे. तसेच मागील वर्षी ज्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती सवलतीचा अर्ज भरला नसेल अशा विद्यार्थ्यांनी वरील वेबसाईटवर नव्याने (Fresh) अर्ज भरावयाचा आहे. शिष्यवृत्ती सवलतीचा अर्ज भरून झाल्यावर त्याची छापील एक प्रत संबंधित काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे कार्यालयात दिनांक 30/11/2023 पर्यंत सकाळी 10.30 ते दुपारी 2.00 या वेळेत द्यावयाचे आहेत. या तारखेपर्यंत छापील अर्जाची प्रत संबंधित कर्मचाऱ्यांकडे जमा न केल्यास त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांवर राहील व शैक्षणिक वर्ष 2023-24 ची पूर्ण फी भरावी लागेल याची नोंद घ्यावी. शिष्यवृत्तीसाठी लागणारी कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत. छापील अर्जासोबत खालील झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

१. एस.एस.सी. / एच.एस.सी. गुणपत्रकाची झेरॉक्स सत्यप्रत - १

२. शाळा सोडल्याचा दाखला झेरॉक्स सत्यप्रत - १

३. मागील वर्षीच्या गुणपत्रकाची झेरॉक्स सत्यप्रत - १

४. जातीच्या दाखल्याची झेरॉक्स सत्यप्रत - १

५. डोमिसाईल दाखला (वय अधिवास दाखला) झेरॉक्स सत्य प्रत - १

६. रेशन कार्ड झेरॉक्स सत्यप्रत - १

७. आधार कार्डची झेरॉक्स सत्यप्रत - १

८. गॅप सर्टिफिकेट (आवश्यक असल्यास )

अ) OBC / VJNT / SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप साठी उत्पन्न मर्यादा रु.1,50,000/- व फ्रिशिप साठी उत्पन्न मर्यादा रू.8,00,000/-

ST / ST प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप साठी उत्पन्न मर्यादा रू.2,50,000/- व फ्रीशिप साठी उत्पन्न मर्यादा नाही

वर नमूद सूचनेनुसार आपल्या उत्पन्न गटाप्रमाणे स्कॉलरशिप / फ्रीशिप चा योग्य पर्याय विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरताना बिनचूक निवडणे आवश्यक आहे व सदर जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे.

आ) फक्त General व ST प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी दरवर्षी नवीन उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

१. सद्यस्थितीत चालू असलेला मोबाईल नंबर आधार कार्डशी संलग्न करणे आवश्यक आहे कारण त्या नंबर वर आपल्या सवलतीच्या अर्जाचा ओटीपी (OTP) नंबर येणार आहे व नंतरच आपला अर्ज भरला जाणार आहे. विद्यार्थ्यांचा स्वतःचा ईमेल आयडी असणे आवश्यक आहे. मोबाईल प्रमाणे ईमेल आयडी वर सुद्धा ओटीपी (OTP) पाठवला जातो. आधार कार्डशी संलग्न झालेला सदर मोबाईल नंबर व ईमेल आयडी बदलू नये.

२. वडील हयात असल्यास वडिलांच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला ची झेरॉक्स सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. वडील हयात नसल्यास आईच्या वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स सत्यप्रत आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे आई वडील दोन्ही हयात नसतील त्यांनी संगोपन करणाऱ्या पालकाच्या वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची झेरॉक्स सादर करावी.

(उत्पन्नाचे सदर दाखले शासनाच्या सेतू कार्यालयामार्फत दिलेले असणे आवश्यक आहे.)

३. वडील हयात नसल्यास त्यांच्या मृत्यूचा दाखला किंवा आई घटस्फोटीत असल्यास त्याबद्दलचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

४. शिक्षण घेत असताना खंड गॅप पडला असल्यास रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

५. स्वतःचे बचत खाते (Bank A/C) कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेतून काढून आपले आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न असणे आवश्यक आहे. त्याची झेरॉक्स सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. बँकेतील खाते NPCI Mapping याच्याशी सुद्धा संलग्न करणे आवश्यक आहे. त्यासाठीचा छापील अर्ज

नोटीस बोर्डवर लावलेला आहे. तसेच महाविद्यालयाची वेबसाईटवर उपलब्ध आहे. सदर अर्ज भरून बँकेमध्ये दाखल करावा

६. महाविद्यालयाने प्रवेशाचे वेळी प्रतिपूर्ती होणारी कोणतीही फी विद्यार्थ्यांकडून घेतली नाही त्यामुळे फी किती भरली या ऑप्शनला शून्य (0) लिहावे.

**<u>ऑनलाइन शिष्यवृत्ती चा अर्ज भरताना खालील प्रमाणे सूचनांचे पालन करून अर्ज भरावा</u>**

१. शिष्यवृत्तीचा ऑनलाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी फक्त मूळ (Original) कागदपत्रे स्कॅन करून ती वेबसाईटवर अपलोड करायची आहेत. कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अपलोड करू नयेत. (Max File Size – 255 KB)

२. SC / ST / NT / SBC या प्रवर्गाचे जे विद्यार्थी शासकीय मागासवर्गीय वसतिगृहात राहत असतील त्यांनीच फक्त HOSTELLER हा ऑप्शन निवडावयाचा आहे. तसेच खाजगी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी (Day Scholar) हा ऑप्शन निवडावयाचा आहे.

३. NT / SBC / OBC या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबातील फक्त दोन मुलगे शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्यास पात्र आहेत. नियमानुसार तिसरा मुलगा शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ शकणार नाही. संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी. मुलींसाठी तसेच SC / ST प्रवर्गासाठी अपत्य मर्यादा नाही.

४. कुटुंबातील पुरुष अपत्यांची संख्या दर्शवणारे प्रतिज्ञापत्र पालकांची तसेच विद्यार्थ्यांची सही करून त्याची स्कॅन केलेली मूळ प्रत (Original) अपलोड करावयाचे आहे. सदर प्रतिज्ञापत्राचा नमुना महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला आहे. तसेच महाविद्यालयाच्या वेबसाईटवर प्रदर्शित करण्यात आला आहे.

**<u>शिष्यवृत्ती चा अर्ज पूर्ण भरून कार्यालयातील खालील कर्मचाऱ्यांकडे द्यावेत :-</u>**

तसेच याबाबत कोणती अडचण आल्यास याच कर्मचाऱ्यांकडे त्वरित संपर्क साधावा.

- वरिष्ठ महाविद्यालय इतर मागासवर्गीय शिष्यवृत्ती / फ्रीशिप शिष्यवृत्ती : श्री. मयूर सुतार

प्राचार्या

गुरूकुल महाविद्यालय, चिपळूण